**विशेष पोलीस वार्तापत्र**
**पोलीस अधीक्षक कार्यालय यवतमाळ**

**दिनांक : ०१/०३/२०२३**

---

## नागपुर मध्यवर्ती कारागृहातुन अभिवचन रजेवरुन फरार असलेल्या बंदयास केली अटक
## स्थानिक गुन्हे शाखा, यवतमाळ ची कारवाई

जिल्हयातील फरार पाहिजे असलेले आरोपी व संचित अभिवचन रजेवरुन फरार असलेले बंदी यांचा शोध घेवुन त्यांना अटक करण्याच्या सुचना पोलीस अधीक्षक, यवतमाळ डॉ. पवन बन्सोड यांनी स्थानिक गुन्हे शाखेला दिल्या होत्या. त्यावरुन स्थानिक गुन्हे शाखेकडील पथके अशा फरार पाहिजे आरोपी व बंदयाची माहिती गोळा करीत होती.

मागील काही दिवसांपुर्वी नागपुर मध्यवर्ती कारागृहाकडुन कारोना आकस्मीक अभिवचन रजेवरुन फरार असलेल्या बंदयाची माहिती स्थानिक गुन्हे शाखेला प्राप्त झाली होती. स्थानिक गुन्हे शाखेकडील पथक वणी उपविभागात अशा आरोपीतांचा शोध घेत असतांना नागपुर मध्यवर्ती कारागृहातुन कारोना आकस्मीक अभिवचन रजेवरुन फरार असलेला बंदी नामे दिपक यशवंत पुणेकर रा. छोरीया लेआउट जवळ गणेशपुर वणी हा वणी परिसरातील असल्याने त्याचे बाबत माहिती घेतली असता त्याचे विरुध्द पो.स्टे. राजुरा जि. चंद्रपुर येथे भादवि कलम २२४ प्रमाणे गुन्हा नोंद असल्याची माहिती प्राप्त होवुन तो नागपुर मध्यवर्ती कारागृहातुन कारोना आकस्मीक अभिवचन रजेवरुन फरार असल्याचे नागपुर कारागृहाकडुन प्राप्त माहिती वरुन निदर्शनात आल्याने सदर बंदयाचा शोध घेतला असता तो त्याचे राहते घरी मिळुन आल्याने त्यास पुढील कारवाई कामी पो.स्टे. राजुरा जि. चंद्रपुर यांचे ताब्यात देण्यात आले आहे.

सदरची कारवाई ही सर्व वरिष्ठ अधिकारी यांचे मार्गदर्शनात सपोनि अमोल मुडे, पोउपनि योगेश रंधे, पोहवा योगेश डगवार, सुनिल खंडागळे, पोना सुधिर पांडे, सुधिर पिदुरकर, निलेश निमकर, पोकॉ रजनिकांत मडावी, चापोना सतिश फुके सर्व स्थागुशा यवतमाळ यांनी यशस्वीरित्या पार पाडली आहे.

**(शुभांगी गुल्हाणे)**
जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधीक्षक, कार्यालय,यवतमाळ